दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 46, 800/-
20 कॅरेट मणी = 1, 33, 460/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 20, 105/-
16 कॅरेट मुरणी = 1, 06, 765/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ६२ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | गुरूवार । १२/०३/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

इराण-इस्रायल युद्धाच्या झळा संगमनेरला

गॅस टंचाईमुळे नागरिकांच्या लांबच लांब रांगा, व्यवसाय अडचणीत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आपल्यापासून हजारो किलोमीटर अंतरावर असलेल्या इराण-इस्रायल युद्धाचे पडसाद आता संगमनेरमध्येही उमटू लागले आहेत. या युद्धामुळे जागतिक स्तरावर इंधन पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याचे परिणाम आता थेट सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचले असून शहरात घरगुती व व्यावसायिक गॅसच्या टंचाईची स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी गॅस एजन्सींच्या कार्यालयाबाहेर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून येत आहे.

केंद्र व राज्य सरकारकडून इंधन पुरवठ्याबाबत सर्व आलबेल असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र संगमनेरमध्ये नागरिकांना गॅस मिळवण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत आहे. अनेक नागरिक कामधंदा बुडवून तासनतास उन्हात उभे राहत आहेत. तरीदेखील गॅस मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढू लागली आहे. काही ठिकाणी गॅस सिलेंडरचा काळाबाजार होत असल्याच्या चर्चेमुळे या संतापात आणखी भर पडली आहे.

इराणसोबत इस्रायल व अमेरिकेच्या संघर्षाला दहा दिवस उलटले असून त्याचे परिणाम इंधन बाजारावर दिसू लागले आहेत. घरगुती गॅसच्या दरात तब्बल ६० रुपयांनी वाढ करण्यात आली असून आता २५ दिवसांनंतरच गॅस बुकिंग करण्याची अट लागू करण्यात आल्याचे नागरिक सांगत आहेत. तसेच व्यावसायिक सिलेंडरच्या पुरवठ्यात मोठी घट झाल्याने शहरातील छोटे-मोठे हॉटेल्स, रेस्टॉरंटस् आणि मिठाईची दुकाने अडचणीत आली आहेत.



गेल्या चार दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा अत्यल्प झाल्याने अनेक व्यावसायिकांवर व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ आली आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, स्वीट मार्ट, केटरिंग व्यवसाय, तसेच पेंटिंग व फॅब्रिकेशनसारखे उद्योगही गॅसअभावी अडचणीत आले आहेत. परिस्थिती अशीच राहिल्यास मोठ्या उद्योगांनाही त्याचा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. लग्नसमारंभ, जेवणावळी व केटरिंग व्यवसायही ठप्प पडण्याच्या मार्गावर असल्याचे व्यावसायिक सांगत आहेत.

दरम्यान शहरात भारत गॅस, एचपी गॅस आदी कंपन्यांचे वितरक व उपवितरक कार्यरत आहेत. मात्र युद्धामुळे भविष्यात गॅस टंचाई निर्माण होईल या भीतीने नागरिकांनी गॅस भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली आहे. मालदाड रोड, लिंक रोड व अकोले रोड परिसरातील गॅस एजन्सींसमोर पहाटेपासूनच (पान ४ वर)

'व्यावसायिक गॅस पुरवठा बंद' दावा दिशाभूल करणारा

राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, व्यावसायिक एलपीजी पुरवठा पूर्णपणे बंद करण्यात आल्याचा दावा दिशाभूल करणारा आहे. केंद्र सरकारने सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीचा विचार करून सर्व राज्यांना घरगुती एलपीजी पुरवठ्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे व्यावसायिक एलपीजी पुरवठ्याच्या प्राधान्यक्रमात तात्पुरता बदल होऊ शकतो ; मात्र तो पूर्णपणे बंद करण्यात आलेला नाही.

आंतरधर्मीय प्रेम प्रकरण, संगमनेरात तणाव आणि रास्तारोको

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - एका समाजातील मुलगी व दुसऱ्या समाजातील मुलगा यांच्यातील प्रेमसंबंधातून लग्नाचा निर्णय घेतल्याने संगमनेर शहरात मंगळवारी दुपारी तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या प्रकरणात पोलिसांनी मुलीला संरक्षण दिल्यामुळे नाराजी व्यक्त करत मुस्लिम तरुणांनी शहरातील तीनबत्ती चौकात काही काळ रास्तारोको आंदोलन केले. उपविभागीय पोलिस अधिकारी व पोलिस अधिकाऱ्यांनी समजूत काढल्यानंतर सुमारे तासाभराने आंदोलन शांत झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेर शहराजवळील एका गावातील शेजारी राहणाऱ्या परंतु दोन वेगवेगळ्या धर्मांच्या मुलगा-मुलीमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले होते. दोघांनीही लग्न करण्याचा निर्णय घेत घरातून निघून गेल्यानंतर पोलिसांनी त्यांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर मुलीला आई-वडिलांच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र मुलीने स्पष्टपणे पालकांकडे जाण्यास नकार दिला. त्यामुळे पोलिसांनी मुलीला काही दिवस सुरक्षिततेच्या कारणास्तव एका वसतिगृहात ठेवण्याचा निर्णय घेतला.

या घटनेतील सदर मुलीला सुरक्षेसाठी ठेवलेल्या ठिकाणी तीच्या पालकांनी तीला नेण्यासाठी जोर जबरदस्ती केल्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी काहीसे आक्रमकपणे तीच्या एका नातेवाईकाला बाजूला करताना त्याला धक्काबुक्की केली. मात्र मुलीच्या आईला मारहाण झाली अशी अफवा सोशल मीडियावर पसरल्याने दुपारी जमाव आक्रमक झाला होता. मात्र सदर व्हिडिओमध्ये या मुलीच्या आईला कुठेही मारहाण झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे हा प्रकार गैरसमजातून झाल्याचे दिसून आले.

मंगळवारी सकाळी ही माहिती मुलीच्या पालकांना मिळाल्यानंतर ते वसतिगृहात पोहोचले आणि मुलीचा ताबा देण्याची मागणी केली. मात्र मुलीचा नकार कायम राहिल्याने पोलिसांनीही हस्तक्षेप टाळला. दरम्यान पालकांनी मुलीला जबरदस्तीने नेण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. या वेळी शहर पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी मुलीच्या (पान ३ वर)

अजित पवारांच्या नावाचा वापर परस्पर करू नये - सरकारचे निर्देष

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी किंवा त्यांच्या नावाने नवीन संस्था सुरू करण्यासाठी आता पवार कुटुंबियांची अधिकृत लेखी परवानगी घेणे कायदेशीररित्या बंधनकारक करण्यात आले आहे. यासंदर्भात राज्याच्या धर्मादाय आयुक्तांनी स्पष्ट निर्देश जारी केले असून, अजितदादांच्या नावाचा कोणताही चुकीचा वापर किंवा

अनधिकृत उपक्रम रोखण्यासाठी हे कडक पाऊल उचलण्यात आले आहे.

अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या दुर्दैवी अपघातात निधन झाले. या घटनेमुळे महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या निधनानंतर राज्यभरात अनेक ठिकाणी त्यांचे स्मारक उभारणे, त्यांच्या नावाने ट्रस्ट सुरू करणे, विविध सामाजिक उपक्रम राबवणे किंवा शासकीय-निमशासकीय योजनांना त्यांचे नाव देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. मात्र, या प्रक्रियेत पारदर्शकता असावी आणि त्यांच्या नावाचा कोणताही चुकीचा वापर होऊ नये, या हेतूने पवार कुटुंबियांनी हे कायदेशीर पाऊल उचलले आहे.

संगमनेर तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आ. खताळ यांची विधानसभेत मागणी

मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संगमनेर मतदारसंघातील विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासाचा प्रश्न आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले. राज्यातील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी त्यांनी सभागृहात केली.

महाराष्ट्रातील अनेक तीर्थक्षेत्रे ही भाविकांसाठी श्रद्धास्थान असून त्याठिकाणी दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक भेट देत असतात. ग्रामीण भागातील अशा तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना सुरू केली आहे. या योजनेच्या

माध्यमातून ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांमध्ये आवश्यक सुविधा निर्माण करून त्यांचा विकास साधण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. याच पार्श्वभूमीवर संगमनेर मतदारसंघातील विविध तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आ. खताळ यांनी केली.

विशेषतः हिवरगाव पावसा येथील श्री खंडोबा महाराज (देवगड) देवस्थान हे तालुक्यातील भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे. या देवस्थानाला दरवर्षी हजारो-लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. अलीकडेच राज्य शासनाच्या माध्यमातून या देवस्थानाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे या परिसरात भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारणे, मंदिर परिसराचा विकास करणे तसेच पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते आणि इतर मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याचे आमदार खताळ यांनी सभागृहात स्पष्ट केले.

तसेच संगमनेर मतदारसंघातील इतर तीर्थक्षेत्रांचाही विकास करण्यात यावा, जेणेकरून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील आणि धार्मिक पर्यटनालाही चालना मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती आमदार अमोल खताळ यांनी सभागृहातून केली.

केवळ कायदे करुन महिलांच्या समस्या सुटणार नाही - प्रा. आशाताई भांगरे

महिलादिनी सौ. नलिनी कळसकर यांचा सत्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सन.१९७५ पासून जागतिक महिला दिन साजरा केला जात आहे. त्यानंतर महिलांच्या हितासाठी व सुरक्षिततेसाठी अनेक कायदे सरकारने केले. अनेक ठिकाणी महिलांना राज्यकारभारात संधी मिळाली. महिलासांठी ३३% आरक्षणही दिले. पण आजही महिला पुरुषांच्या अहंकारी स्वभावामुळे सक्षमपणे सर्वच क्षेत्रात काम करु शकल्या नाहीत. त्यासाठी फक्त कायदे करुन नाही तर मानसिकता बदलली तरच महिला सक्षमपणे काम करतील. आणि मग या देशातील अनेक सुटतील. आजही ही परिस्थिती बदलण्यासाठी आपण सर्वांनी मिळून काम केले पाहिजे. असे सौ. भांगरे मॅडम म्हणाल्या.

मराठा पतसंस्था अहिल्यानगर आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. जागतिक महिला दिनानिमित्त कळसकर विद्यालयाच्या संस्थापिका सौ. नलिनी कळसकर यांचा सत्कार आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य के. के. देशमुख सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजीराव फटांगरे सो. ता. कळसकर गुरुजी, संपादक किसन भाऊ हासे सर होते.

सर्व पाहुण्यांचा सत्कार केल्यानंतर मनोगत व्यक्त करताना शिवाजीराव फटांगरे म्हणाले की आज देश स्त्री -पुरुष विषय जन्म दरातून जात आहे. आज खेड्यात यांची समस्या तीव्र आहे. याबाबत फक्त सरकार काम करुन चालणार नाही तर आपण सर्वांनी एकत्रपणे काम केले पाहिजे.

प्राचार्य के. के. देशमुख सर म्हणाले की ग्रामीण भागातील संसार महिलांच्या जीवावर उभे आहेत. पण महिलांना मानाची वागणूक दिली जात नाही.यासाठी आपण सर्व सुखाचा शोध घेत फिरत असलो तरी सुख मात्र आपले घरात आहे ते म्हणजे आपले घरातील महिलांना आदर्श वागणुक देणे होय. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक के. के. डोंगरे यांनी केले. ते म्हणाले मराठा पतसंस्था फक्त बँकींग क्षेत्रा इतके मर्यादित काम करत नाही. तर समाजाला वेगवेगळ्या क्षेत्रात दिशा देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करते. प्रस्तावीक श्री. नवले सर यांनी केले. आभार शांताराम घूले सर यांनी मानले. या कार्यक्रमाला संगमनेर तालुका पेन्शन संघटनेचे व जेष्ठ नागरिक संघटनेचे पदाधिकारी व संस्थेचे सभासद व कर्मचारी उपस्थित होते.

मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्याकडून आयएएस ऋतुजा गायकवाडचा गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी

संगमनेर - तालुक्यातील नान्नज दुमाला या दुष्काळी व दुर्गम गावातील शेतकरी कुटुंबातील ऋतुजा अशोक गायकवाड हिने यूपीएससी परीक्षेत ऑल इंडिया १०६ वा क्रमांक मिळवत आयएएस पदासाठी उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेच्या वतीने माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांनी नान्नज दुमाला येथे तिचा सत्कार केला. तसेच जोर्वे येथील धनंजय संजय दिघे यांनी आयपीएस पदासाठी यश मिळविल्याबद्दल त्यांचाही स्थानिक गावकऱ्यांच्या वतीने गौरव करण्यात आला.

ऋतुजा गायकवाड ही शेतकरी कुटुंबातील असून तिचे वडील अशोक गायकवाड यांनी मोठ्या कष्टातून डी.एड.चे शिक्षण पूर्ण करून गावातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून सेवा बजावली. ऋतुजानेही प्राथमिक शिक्षण याच जिल्हा परिषद शाळेत घेतले. ग्रामीण भागातून शिक्षण घेत जिद्द, चिकाटी आणि परिश्रम यांच्या जोरावर तिने यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेत यश संपादन करत संगमनेर तालुक्याचे नाव राज्यभर उज्वल केले आहे. जोर्वे येथील धनंजय दिघे यांनीही यूपीएससी परीक्षेत यश मिळवत आयपीएस होण्याचा मान मिळवला.

त्यांच्या कुटुंबाची पार्श्वभूमीही शिक्षणाला प्राधान्य देणारी आहे. त्यांच्या भावंडांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हे कुटुंबही शेतकरी पार्श्वभूमीचे आहे. विशेष म्हणजे हे दोन्ही विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेचे माजी विद्यार्थी आहेत. ग्रामीण व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी प्रामाणिक परिश्रमातून मिळवलेले हे यश समाजासाठी आदर्शवत असल्याचे डॉ. तांबे यांनी सांगितले. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, ऋतुजाचे यश अत्यंत प्रेरणादायी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्याचा आदर्श तिने घालून दिला आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श

ऋतुजा अशोक गायकवाड – यूपीएससी, ऑल इंडिया रँक १०६, आयएएस धनंजय संजय दिघे (जोर्वे) – आयपीएससाठी निवड हे दोन्ही विद्यार्थी संगमनेर तालुक्यातील ग्रामीण व शेतकरी कुटुंबातील असून जिल्हा परिषद शाळेचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नवा आदर्श निर्माण झाला आहे.

संगमनेर येथे दिनकर साळवे स्मृती पुरस्कार वितरण सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - परिवर्तनवादी चळवळीत कार्यरत असलेले कार्यकर्ते, लेखक व कवी स्व. दिनकर साळवे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'दिनकर साळवे स्मृती पुरस्कार' यंदा पाचव्या वर्षी प्रदान करण्यात येणार आहे. यावर्षीचा पुरस्कार रमाई मासिकाच्या संपादक, लेखिका व व्याख्यात्या प्रा. डॉ. रेखा मेश्राम (छत्रपती संभाजीनगर) यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यांनी आपल्या लेखणीतून दुर्लक्षित वर्गाला न्याय मिळवून देण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. आपल्या व्याख्यानातून देखील त्या पुरोगामी विचार समाजापर्यंत पोचवत असतात.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास ज्येष्ठ पत्रकार, लेखक व व्याख्याते ज्ञानेश महाराव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक पदवीधर मतदार संघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संगमनेर येथील व्यापारी असोसिएशन हॉल येथे आयोजित करण्यात आला आहे.

दिनकर साळवे यांच्या नावाने हा पुरस्कार सलग पाचव्या वर्षी दिला जात असून यापूर्वी हा पुरस्कार प्रा. किसन चव्हाण (नेवासा), प्रा. गंगाधर अहिरे (नाशिक), डॉ. सोमनाथ मुटकुळे (संगमनेर) आणि हेरंब कुलकर्णी (अकोले) यांना प्रदान करण्यात आला आहे. परिवर्तनवादी विचारसरणीशी निष्ठा असलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दोन लाखाच्या विदेशी दारुची चोरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव दिघे - संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील संगमनेर रस्त्यालगत असलेल्या हॉटेल रुपेश बिअर बार व परमिट रूमच्या खिडकीचे गज कापून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करीत रात्रीच्या सुमारास विविध नामांकित कंपनीच्या तब्बल २ लाख ३ हजार ५५० रुपये किंमतीच्या विदेशी दारूच्या बाटल्या आणि डीव्हीआर चोरून नेला. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तळेगाव दिघे येथील संगमनेर रस्त्यालगत असलेल्या समर्थ पेट्रोल पंपानजीक सुरेश गंगाराम दिघे यांच्या मालकीचे हॉटेल रुपेश बिअर बार व परमिट रूम आहे. मुरुवार दि. ५ मार्च ते शुक्रवार दि ६ मार्च दरम्यान रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने बिअर बारले असलेल्या खिडकीचे गज कापून आत प्रवेश केला. काउंटरमध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या विदेशी दारूच्या बाटल्या तसेच

बिअर बार स्टोअर रूमचे कुलूप तोडून सीपी कंपनीचा डीव्हीआर असा एकूण २ लाख ३ हजार ५५० रुपये किंमतीच्या मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी सुरेश दिघे यांनी पोलिसांत फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्या विरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलीस अधिक तपास करीत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

आता महिनाभरात होणार जमीन मोजणी

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी आणि नागरिकांना जलद सेवा देण्यासाठी महसूल विभागाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. आता शासकीय मोजणी कामी खासगी परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्यात आली असून, ३० मार्च २०२६ पासून हे भूमापक प्रत्यक्ष मैदानात उतरणार आहेत, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत दिली. यामुळे मोजणीची प्रक्रिया आता केवळ १५ ते ३० दिवसांत पूर्ण होणार आहे.

राज्यात सध्या पोट-हिस्सा, हद्दकायम, बिनशेती आणि गुंठेवारीसारख्या मोजणी प्रकरणांचा निपटारा मनुष्यबळाअभावी रखडला होता. यावर उपाय म्हणून शासनाने २०० परवानाधारक भूमापकांना दोन खासगी अभिकरणांमार्फत कार्यारंभ आदेश दिले आहेत. हे भूमापक दोन आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण पूर्ण करून कामावर रुजू होतील. चर्चेदरम्यान माजी मंत्री जयंत पाटील यांनी एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे सरकारचे लक्ष वेधले. त्यावर उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, जयंत पाटील यांची सूचना अत्यंत रास्त आहे. अडीच एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या अल्पभूधारकांसाठी मोजणी शुल्काबाबत शासन वेगळा आणि सहानुभूतीपूर्वक विचार करत आहे. राज्यातील ज्या १७-१८ तालुक्यांमध्ये मोजणीची प्रकरणे सर्वाधिक प्रलंबित आहेत, तिथे 'पायलट प्रोजेक्ट' राबवण्यात येणार आहे. प्रत्येक महसूल विभागातील ३ तालुके याप्रमाणे एकूण १८ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे.

भंडारदरा शताब्दी महोत्सव पर्यटकांसाठी आकर्षण - जलसंपदामंत्री

छाया – विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या भंडारदरा धरणाचे शताब्दी वर्ष सांस्कृतिक व निसर्ग पर्यटनातून साजरे करण्याच्या दृष्टीने सर्वंकष कृती आराखडा तयार करावा, अशा सूचना जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. विधान भवनात या आराखड्याचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेटे व स्वप्नील काळे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

भंडारदरा धरणाचे शताब्दी वर्ष ऐतिहासिक असून या निमित्ताने राज्य शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन केली आहे. जलाशय परिसराचे सुशोभीकरण, सांस्कृतिक व पर्यटन विकासातून हे वर्ष साजरे करण्यासाठी जलसंपदा विभागाने विशेष आराखडा तयार केला आहे. हा आराखडा अंतिम मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांसमोर सादर करून त्यास मान्यता घेतली जाणार असल्याचे मंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

या धरणामुळे जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले असून हे बदल नव्या पिढीसमोर सादरीकरणाच्या माध्यमातून मांडण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शताब्दी महोत्सवाचा स्वतंत्र लोगो तयार करावा व प्रत्येक महिन्यात एका कार्यक्रमाचे आयोजन करून वर्षभर हा उत्सव साजरा करावा. यात स्थानिक कलाकारांना संधी देऊन त्यांच्या रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न व्हावेत. तसेच, पर्यटकांना आकर्षित करणारे पाण्यावर आधारित उपक्रम राबवावेत, असेही त्यांनी सुचवले. या महोत्सवाची व्याप्ती धरणापासून ते अंतिम चारीपर्यंत असावी. याशिवाय, स्वतंत्र वेबसाईट तयार करून समाजमाध्यमांद्वारे या शताब्दी वर्षाची व्यापक प्रसिद्धी व प्रसार करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेते महामंडळ पुढील अधिवेशनाच्या आत स्थापन करणार- मंत्री शेलार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र शासनाने ऑक्टोबर २०२४ मध्ये पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कल्याणासाठी दोन स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. मात्र दोन वर्षांनंतरही पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कल्याणासाठी दोन स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळांची स्थापना झालेली नाही. त्यामुळे आमदार श्रीकांत भारतीय यांनी विधान परिषदेत लक्षवेधी सूचना उपस्थित करत पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले. श्रीकांत भारतीय यांच्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री आशिष शेलार यांनी पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची कार्यवाही पुढील अधिवेशनाच्या आत करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. तसेच पत्रकारांच्या विविध विषयांवर पत्रकार संघटना, शासनातील विविध विभाग आणि संबंधित लोकप्रतिनिधी यांची एक व्यापक बैठक लवकरच घेण्यात येईल, अशी माहिति दिली.

श्रीकांत भारतीय लक्षवेधीच्या माध्यमातून पत्रकार आणि वृत्तपत्र विद्यार्थ्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, कोरोनानंतर वृत्तपत्र क्षेत्रात निर्माण झालेल्या अडचणी, त्यातून निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने असलेल्या त्यांचे योजनेचे प्रस्ताव रखडणे, वर्तमानपत्र खरेदी करणारे वाचकांना आयकरात सूट देणे, पत्रकारांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी महामंडळातर्फे मदतीची आवश्यकता, गृहनिर्माण योजनेअंतर्गत पत्रकारांना घरे देणे, जाहिरातीवरील जीएसटी रद्द करणे, अशा विविध विषयांकडे सभागृहाचे लक्ष वेधले.मुख्यमंत्र्यांच्यावतीने उत्तर देताना मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले की, दोन्ही महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय मंत्री मंडळाने १० ऑक्टोबर २०२४ ला घेतला होता. विविध खात्यांशी या विषयांचा समन्वय करायचा असल्याने ती प्रक्रिया सुरू असून पुढील अधिवेशनाच्या आत याबाबत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून ही महामंडळे स्थापन करण्यात येतील. तसेच वर्तमानपत्रांचे आपल्या लोकशाही प्रक्रियेत महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळेच चौथा स्तंभ म्हणून आपण स्थान दिले आहे. कोरोना काळात या क्षेत्रासमोर अनेक अडचणी निर्माण झाली तशीच काही नवीन आव्हाने सुध्दा उभी राहिली आहेत. त्यामुळे यातून मार्ग काढून या क्षेत्रातील अडचणी सोडवण्यासाठी जे जे प्रयत्न करतील, ते शासन करत आहे, असे उत्तर आशिष शेलार यांनी दिले.

कौठवाडीत शॉर्टसर्किटमुळे घराला आग आदिवासी कुटुंबाचा संसार जळून खाक

छाया – विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- तालुक्यातील राजूर जवळ असलेल्या कौठवाडी येथे शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत एका गरीब आदिवासी कुटुंबाचा संपूर्ण संसार जळून खाक झाल्याची घटना घडली. दरम्यान घरात असलेल्या लहान चिमुरड्यासह वयोवृद्ध सासु-सासऱ्याना वाचवण्यात सुनबाईला यश आले. मात्र या दुर्घटनेत घराचे मोठे नुकसान झाले असून, वर्षभराचे अन्नधान्य, भांडे, घरगुती साहित्य तसेच काही रोख रक्कम आगीत भस्मसात होऊन सुमारे साडेचार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

आदिवासी भागात असलेल्या कौठवाडी गावातील आंबेदरा येथे गंभिरे कुटुंब हे शेतात वास्तव्यास आहेत. परंतु दुपारच्या वेळेस जवळील शेतात काम करण्यासाठी घरातील सर्व मंडळी गेली होती. घराजवळील शेतात दुपारच्या सुमारास घरावरील विद्युत तारांमध्ये घर्षण होऊन ठिणग्या पडल्या आणि जवळपास असलेले गवत जळत त्यातून घराला आग लागली. घरामध्ये लहान चिमुरडी होती. वयोवृद्ध आजोबा अर्धांगवायूने आजारी तर वयोवृद्ध आजीही घरात होती. आपल्या घराला आग लागल्यामुळे धुर आल्याचे सुनबाई मिरा गंभिरे हिच्या लक्षात येताचं तीने शेतातून हातातलं काम सोडून घराकडे धाव घेतली. सुनेने चिमुरड्यासह वयोवृद्ध सासऱ्याला बाहेर काढले. ग्रामस्थंही तिच्या मदतीला धावले.

घरातील धान्य, कागदपत्रे, गॅस शेगडी, भांडे आगीत जळून खाक झाले. गावकऱ्यांनी तत्परतेने प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत गंभिरे कुटुंबाचा सर्व संसार जळून खाक झाला होता. राजूर म.रा.विज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केल्याची माहिती उपअभियंता विठ्ठल सोनवणे यांनी दिली. दरम्यान, कौठवाडी (आंबेदरा) येथील धोंडु लक्षण गंभिरे यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत भात, गहु, बाजरी, कपाट, दाग दागिने, दहा हजार रुपये रोख रक्कम, कपडे, भांडे आणि सर्व संसार जळून खाक झाला असुन साडेचार लाखांचे नुकसान झाले. तर सरपंच लता धादवड, उपसरपंच लता भोईर, राजेंद्र धादवड, रमेश भोईर व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पंचनामा केल्याची माहिती तलाठी प्रिती गिहे यांनी दिली.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफ्रुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरक्षित, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line : 7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

एम.पी.एस.सी. परीक्षेत गणोरेची चमक

दोन तरुण झाले पी.एस.आय.

गणोरे (युवावार्ता प्रतिनिधी)– नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अनेक तरुण तरुणींनी उत्तुंग भरारी घेतली आहे. त्यामध्ये संगमनेर अकोले तालुक्यातील तरुणांनी बाजी मारली आहे. त्यामध्ये गणोरे गावचे चि. अविनाश बाळासाहेब आंबरे व चि. निलेश शांताराम आंबरे हे दोन युवक पी. एस. आय. झाले आहे. त्यामुळे गावाला एकाच वेळी दोन अधिकारी लाभल्यामुळे यांच्या कुटुंबाचा आनंद गगनात मावेना असे झाले आहे. गणोरे गावात दिवसेंदिवस अधिकारी होण्याचे स्वप्न वाढत चालले आहे. ते स्वप्न साकार करण्याचे काम या आदर्श तरुणांकडून होताना दिसत आहे. गणोरे गावात या वर्षी बहुतेक सरकारी अधिकारी झाल्याचे दिसून येत आहे. चि. अविनाश बाळासाहेब आंबरे यांचे गावात जोरदार स्वागत केले गेले. अविनाश व निलेश हे अगदी सर्वसामान्य कुटुंबातील तरुण आहेत. निलेश शांताराम आंबरे यांचाही सन्मान लवकरच करण्यात येणार आहे.अविनाश यांचे शिक्षण छत्रपती शिवाजी महाविद्यालय, गणोरे येथे पूर्ण करत बी. टेक विद्युत अभियांत्रिकी चे उच्च शिक्षण मुंबई येथे घेतले. अविनाश ने आपला उदरनिर्वाह करण्यासाठी खाजगी कोचिंग क्लासेस येथे नोकरी केली. आणि आपल्या मेहनतीच्या जीवावर यश संपादन केले. वडील बाळासाहेब आंबरे हे अविनाश कृषी सेवा केंद्र, गणोरे येथे आपला व्यवसाय करुन अविनाशचे शिक्षण केले. आई सीमा बाळासाहेब आंबरे यांनी अविनाशला नेहमीच पाठींबा दिला.

अविनाश चा आपुलकी फॉउंडेशन च्या वतीने सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष दिपकशेठ वर्पे यांनी अविनाश चा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. त्यावेळी त्यांनी सांगितले की, या गावात अधिकाऱ्यांची रांग वाढत चालली आहे आणि त्याचे कारण म्हणजे गावातून होणारे अधिकारी हे आदर्श घाढवण्याचे काम करत आहे. या मेहनती तरुणांच्या यशामुळे पुढच्या पिढीला एक दिशा मिळत आहे, असे दिपकशेठ वर्पे म्हणाले. त्याप्रसंगी सोसायटी चे चेअरमन बाळासाहेब घोसाळे, सुभाष जयराम आहेर, सतीश आंबरे, सोमनाथ आहेर, ह. भ. प. अण्णासाहेब दातीर, लक्ष्मण मोरे, बादशहा आंबरे, जालिंदर आंबरे, संजय भाऊसाहेब दातीर, जालिंदर वर्पे, गोरख आहेर आदी उपस्थित होते.

आंतरधर्मीय प्रेम प्रकरण...

पान ०१ वरुन- आईसह नातेवाईकांना धक्काबुक्की, मारहाण केल्याचा आरोप नातेवाईकांनी व समाजबांधवांनी केला आहे. पोलिसांनी मुलीला दुसर्या वाहनातून सुरक्षित स्थळी हलवल्यानंतर या प्रकाराबाबत समाजात नाराजी पसरली. सध्या रमजानचा महिना सुरू असताना पोलिसांनी संयमाने वागायला हवे होते, असा आरोपही करण्यात आला. याच्या निषेधार्थ सुरुवातीला मोठा जमाव शहर पोलिस ठाण्यात जमा झाला. मात्र दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत हा जमाव दुपारी सुमारे चारच्या सुमारास तीनबत्ती चौकात जमा झाला आणि रास्तारोको आंदोलन सुरू केले. मारहाण केल्याचा आरोप असलेल्या पोलिस अधिकार्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. त्यामुळे काही काळ वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली व परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, पोलिस निरीक्षक समीर बारवकर व मोठा पोलिस बंदोबस्त घटनास्थळी दाखल झाला. त्यांनी आंदोलनकर्त्यांची समजूत काढल्यानंतर सुमारे तासाभराने आंदोलन मागे घेण्यात आले. सध्या परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

पंतप्रधानांविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह वक्तव्य

संबंधित महिलेवर तात्काळ कारवाईची भाजपची मागणी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- सोशल मीडियाच्या माध्यमातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह व अश्लील वक्तव्य करणाऱ्या संबंधित महिलेवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी संगमनेर शहर मंडळाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात संगमनेर शहर पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

संगमनेर तालुक्यातील घारगाव (कुरकुंडी) येथील रुकसार पटेल या महिलेने फेसबुकवरील बॉलीवूड ट्रेंड या पेजवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी अत्यंत अश्लील, अपमानास्पद व समाजात तेढ निर्माण करणारे वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे समाजात तणाव निर्माण होण्याची शक्यता असून सामाजिक सलोखा बिघडू शकतो. त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन माहिती तंत्रज्ञान कायदा तसेच भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये त्वरित गुन्हा नोंदवून संबंधित महिलेवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. हे निवेदन भारतीय जनता पार्टी संगमनेर शहर मंडळाच्या शहराध्यक्ष सौ. पायलताई आशिष ताजणे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

यावेळी ज्योती भोर, निता मोहरीकर, रूपाली उंडे, कांचन मोंढे, अरुणा पवार, अंजली शिंदे, मनीषा कांबळे, प्रभावती करपे, मदुरा पोळ, दिपाली कोळपकर, भारत गवळी, विशाल एनगंदुल, शुभम लहामगे, हरिश्चंद्र चकोर, साहेबराव वलवे, सोमनाथ सातपुते, किरपाल डंग, शिवकुमार भंगीरे, अरुण कुलकर्णी, श्याम कोळपकर, आकाश सहाणे, अविनाश फटांगरे, दिलीप रावल, आशिष ताजणे, सागर भोईर, गिरीश ससाने, वैभव आडांगळे, संतोष पठाडे, विकास गुळवे, रोहिदास साबळे, जगन्नाथ शिंदे, अमोल रनाते, प्रशांत दातीर, अशोक निळे आदी उपस्थित होते.

प्राचार्या मंजुषा काळे शैक्षणिक राज्यस्तरीय पुरस्कारने सन्मानित

राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)- अकोले तालुक्यातील आदिवासी भागात गेली ३३ वर्षे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मंजुषा काळे यांना 'ऋणानुबंध' बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अहिल्यानगर येथील 'ऋणानुबंध' बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने हा सन्मान प्रदान केला असून, जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर येथे होणाऱ्या कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला आहे.

आदिवासी भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मंजुषा काळे यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत संस्थेने त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अजित रोकडे यांनी दिली.

या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला व्यापक पातळीवर दाद मिळणार असून, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांना प्रेरणा मिळेल, असा विश्वासही संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. ऋणानुबंध संस्थेचे दरवर्षी दिले जाणारे यावर्षी महिला दिनाचे औचित्य साधून महिलांना समर्पित होते. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजाला प्रेरणा देणारे वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या समाजातल्या विविध घटकांचा सन्मान या पुरस्काराच्या निमित्ताने ऋणानुबंध करत असते.

यावर्षीच्या या सोहळ्यात प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. तात्याराव लहाने, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महापौर सौ. ज्योती गाडे, डॉ. गिरीश कुलकर्णी, नितीन उदमले इत्यादी मान्यवर उपस्थित झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत बंडगर यांनी केले, तर आभार प्राध्यापिका सारिका सूर्यवंशी यांनी मानले.

जिजा दातीर यांना पीएच.डी.

राहाता (युवावार्ता प्रतिनिधी)- येकरूखे येथील डॉ. रमेश दातीर यांची पत्नी जिजा दातीर यांना बेंगलोर येथील जैन विद्यापीठातून पी.एच.डी. पदवी प्रदान झाली आहे. त्यांनी मॅनेजमेंट या विषयातील Correlates off success in development programme या विषयात आपला शोधप्रबंध सादर केला होता. संशोधनादरम्यान त्यांनी जागतिक स्तरावर चार रिसर्च पेपर व भारत सरकार प्रमाणित रिसर्च पेटंट मिळवले.

जिजा दातीर या बेंगलोर युनिव्हर्सिटी मध्ये प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत. जिजा दातीर यांचे प्राथमिक शिक्षण धनगरवाडी, ता. श्रीरामपूर येथून झाले. त्यानंतर कोपरगाव येथून त्यांनी माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच बी.सी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर लोणी येथून एम.बी.ए. पदवी मिळवली.

तैवान, कोरिया तसेच स्वित्झर्लंड मधील वास्तव्या दरम्यान त्यांनी तैवानीज, कोरियन तसेच जर्मन बोलीभाषेचे स्किलही आत्मसात केले. जिजा दातीर यांच्या व्यक्तिमत्वाने ग्रामीण भागातील तरुणांना एक वेगळा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या यशाबद्दल एकदखे ग्रामस्थ तसेच विविध शैक्षणिक स्तरातून त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या स्मृतिदिनानिमित्त १४ मार्च रोजी विविध कार्यक्रम

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- अमृत उद्योग समूहाचे जनक, स्वातंत्र्यसेनानी आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे प्रेरणास्थान असलेले सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या स्मृतिदिनानिमित्त अमृत उद्योग समूहाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दिनांक १४ मार्च २०२६ रोजी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या स्मृतीस्थळी आदरांजली कार्यक्रम, तसेच ज्येष्ठ संपादक व लेखक मल्हार अरणकल्ले यांचे स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब थोरात यांच्या जीवनचरित्रावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागात सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे मोठे कार्य सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी केले. सचोटी, पारदर्शकता आणि शेतकरी हिताचा ध्यास या मूल्यांवर उभा असलेला अमृत उद्योग समूह ही त्यांच्या कार्याची जिवंत परंपरा मानली जाते. सहकार क्षेत्रात आदर्श मानल्या जाणाऱ्या या कार्याचा गौरव म्हणून दरवर्षी त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

शनिवार दिनांक १४ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात स्मृतीस्थळी आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब थोरात यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या सहकार चळवळीतील योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे. त्यानंतर सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात ज्येष्ठ संपादक आणि लेखक मल्हार अरणकल्ले यांचे भाऊसाहेब थोरात यांच्या जीवनचरित्रावर व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानातून भाऊसाहेबांच्या कार्याचा, सहकार चळवळीतील त्यांच्या नेतृत्वाचा आणि ग्रामीण समाजासाठी त्यांनी उभ्या केलेल्या आदर्शांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता, सभागृह, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, प्रशासकीय भवन येथे 'भजनसंध्या' आयोजित केलेली आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विधान परिषदेचे माजी सदस्य डॉ. सुधीर तांबे, अमेय पब्लिकेशन्सचे प्रमुख उल्हास लाटकर, आमदार सत्यजित तांबे, ड. माधवराव कानवडे, सौ. दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, पांडुरंग पा. घुले, बाबा ओहळ, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी, लक्ष्मणराव कुटे, रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे, संपतराव डोंगरे, डॉ. मैथिलीताई तांबे, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, गणपतराव सांगळे, रामदास वाघ, अर्चनाताई बालोडे, प्रा. बाबा खरात, प्राचार्य केशवराव जाधव, राजेंद्र गुंजाळ, राजेंद्र कडलग, ड. सुहास आहेर, सुभाष सांगळे, निखील पापडेजा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, शेतकरी, कामगार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे पांडुरंग पाटील घुले, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर व अमृत उद्योग समूह यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्यालय: भिंगवण रोड, बारामती, जि. पुणे

जंगम मालमत्तेचा जाहिर लिलाव

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १५६ च्या अधिन व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या कलम १०७ सह) तमाम लोकांना कळविण्यात येते की, बँकेच्या संगमनेर शाखेचे खालील कर्ज थकबाकीदार / गहाणखतदार व त्यांचे जमीनदार यांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे वसुली अधिकारी यांनी जप्त केलेली' जेथे व जशी आहे त्या स्थितीत ' जंगम मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री दि बारामती सहकारी बँक लि. शाखा संगमनेर या ठिकाणी व खाली नमूद केलेल्या वेळेत होणार आहे. तरी ज्या इच्छुक खरेदीदारांना सदरची मिळकत घ्यावयाची असेल, त्यांनी दिलेल्या वेळेपूर्वी एक तास आगोदर लिलावाच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

अ. क्र.	कर्ज थकबाकीदाराचे नाव	वसुली दाखला क्रमांक, दिनांक व वसुलपात्र रक्कम	दिनांक, वेळ व स्थळ
१	१) श्री. अरुण वसंत आहेर रा. पिसेवाडी, पिंपळगाव कोंझीरा, पो. वडगाव लांडगा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर २) सौ. अनिता शंकर गोर्डे रा. मु. पो. पिंपळगाव निपाणी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर ३) श्री. राजेंद्र यशवंत मोरे, मु. पिंपळगाव कोझींरा, पो. वडगाव लांडगा, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	१) दाखला क्रमांक :– कलम १०१/१५१/२०२४, दि. २६/१२/२०२४, रू. ७७४७८.३२/- अधिक येणे व्याज	सोमवार - ३०/०३/२०२६ वेळ - सकाळी ११.०० वा. स्थळ - शाखा : संगमनेर जाणता राजा मार्ग, संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
	जंगम मालमतत्तेचा तपशील श्री. अरूण वसंत आहेर यांच्या मालकीची MH 17 BT 4884 रॉयल इंफिल्ड कंपनीची मोटारसायकल वाजवी मुल्यांकन : रू. ५४६०० /–		

टिप : १) कोणतेही कारण न दाखविता लिलाव मंजूर करणे अगर नामंजूर करणे, लिलाव स्थगित करणे वा पुढे ढकलणे याबाबतचे सर्व अधिकार खाली सही करणार वसुली अधिकारी व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. २) लिलावाच्या अटी व शर्तींचे वाचन लिलावाच्या वेळी करण्यात येईल. तत्पूर्वी अटी व शर्ती वसुली अधिकारी दि बारामती सहकारी बँक लि. मुख्यालय भिगवण रोड, बारामती, जि. पुणे व बँकेच्या संगमनेर शाखा येथे पहावयास मिळतील ३) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झालेस लिलाव रद्द करणेत येईल ४) सदर तारखेच्या लिलावास कोणतेही बोलीधारक न आल्यास या तारखेपासून ७ दिवसाच्या आत म्हणजेच दि.०६/०४/२०२६ रोजी याच ठिकाणी लिलाव घेण्यात येतील व त्यासाठी आपणास वेगळी नोटीस दिली जाणार नाही.

सिल

सही /-
श्री. नवनाथ यशवंत जगताप
वसुली व विक्री अधिकारी, दि बारामती सहकारी बँक लि.
बारामती, मो.क्र. ८३९०५७३३३३

(वरील आदेश हा वसुली व विक्री अधिकारी दि बारामती सहकारी बँक लि. बारामती यांचा संक्षिप्त भाग असून मूळ आदेश बँकेच्या सूचना फलकावर लावून प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. वरील स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव कर्ज थकबाकीदार / मालमत्ताधारक यांना जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्री संबंधी उद्घोषणा व नियम क्र. १०७ (११) (सी) नुसार दि. ११/०३/२०२६ रोजी रजिस्टर पोस्टाद्वारे दिलेल्या नोटीसीचा पुरवणी भाग असून थकबाकीदार, मालमत्ताधारक व तमाम जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. कायदेशीर बाबींसाठी दि. ११/०३/२०२६ रोजी दिलेली नोटीस ग्राह्य धरावी.

पाहिजेत जयहिंद आश्रमशाळा कोळवाडे

एस.एम.बी.टी. सेवाभावी ट्रस्ट संचलित जयहिंद आदिवासी आश्रमशाळा कोळवाडे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या अनुदानित आश्रमशाळेत खालील पदे भरावयाची असून इच्छुक पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे नाव	शैक्षणिक अर्हता	पदसंख्या	आरक्षण
सहाय्यक प्राध्यापक	बी. एस. डब्लु./ एम. एस. डब्लु.	०१	खुला (open)
लिपिक	बी. ए./ बी. कॉम./ बी.एस्सी.	०१	इतर मागास वर्ग (OBC)
स्वयंपाकी	७ वी. पास	०२	अनुसूचित जमाती (ST)- १ भटक्या विमुक्त जमाती (NT-C)- १
स्वयंपाकी मदतनीस	७ वी. पास	०१	खुला (open)

नियम व अटी : १) कर्मचारी नियुक्ती शासनाच्या धोरणानुसार जे नियम, अटी व निर्णय असतील त्यावर अवलंबुन राहिल. २) आरक्षीत पदासाठी अर्ज असेल तर जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. ३) ट्रस्ट संचलित आश्रमशाळा निवासी असल्याने शाळेच्या आवारात निवासी राहुनच पूर्ण वेळ काम करावे लागेल. ४) शासनाने व संस्थेने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश, परिपत्रके यांची अमंलबजावणी, पालन करणे सदर उमेदवारांना बंधनकारक राहिल.

वरील सर्व अटी मान्य व पात्र असणा-या उमेदवारांनी आपले परिपूर्ण अर्ज एस.एम.बी.टी. सेवाभावी ट्रस्ट, घुलेवाडी, अमृतनगर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील कार्यालयात जाहिरात दिल्यापासून १५ दिवसांच्या आत (दिनांक २५/०३/२०२६ पर्यंत) पोहोच होतील अशा कालावधीत पाठवावे. विहित मुदती नंतर अर्ज आल्यास सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही.

मुख्याधिकारी
एस.एम.बी. टी. सेवाभावी ट्रस्ट, अमृतनगर, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.

संपादकीय...

जयंतीनिम्मित

महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय इतिहासात ज्यांनी आपल्या दूरदृष्टीने आणि कार्यक्षम नेतृत्वाने अमिट ठसा उमटवला, अशा महान नेत्यांपैकी एक म्हणजे यशवंतराव चव्हाण. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या विकासाची भक्कम पायाभरणी करणाऱ्या या द्रष्ट्या नेत्याची आज जयंती आहे. महाराष्ट्राच्या घडणीत त्यांच्या योगदानामुळे त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते असे गौरवाने संबोधले जाते. १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात यशवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या या मुलाने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले आणि पुढे आपल्या बुद्धिमत्ता, परिश्रम व दूरदृष्टीच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्व गाजवले. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर पुढील शिक्षणासाठी त्यांनी कोल्हापूर आणि पुणे येथे प्रवेश घेतला. पुण्यात त्यांनी बी.ए. आणि एल.एल.बी. पदवी प्राप्त केली. शिक्षण घेत असतानाच त्यांच्यावर राष्ट्रीय चळवळीचे संस्कार झाले आणि त्यांचे मन स्वातंत्र्यलढ्याकडे वळले. महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रेरित होऊन यशवंतराव चव्हाण यांनी स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय सहभाग घेतला. १९३० साली त्यांनी गांधीजींच्या सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला. त्यानंतर १९३२ साली ब्रिटिश सरकारने त्यांना अटक करून तुरुंगवास दिला. स्वातंत्र्यलढ्याच्या या संघर्षमय काळात त्यांनी अनेक संकटांना सामोरे जाऊनही आपल्या ध्येयापासून कधीही माघार घेतली नाही. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनातही त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रभावी कार्यकर्ते म्हणून आपली ओळख निर्माण केली. स्वातंत्र्यानंतरच्या काळातही त्यांचे राजकीय नेतृत्व अधिक प्रगल्भ होत गेले. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडून आले. त्यानंतर त्यांची संसदीय मंडळाचे चिटणीस म्हणून नियुक्ती झाली. १९४८ साली काँग्रेसच्या चिटणीस पदावरही त्यांची निवड झाली. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था आणि पुरवठा खात्याचे मंत्री बनले. या पदावर कार्यरत असताना त्यांनी प्रशासनात कार्यक्षमतेची नवी परंपरा निर्माण केली १९५६ साली द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती झाल्यानंतर १ नोव्हेंबर १९५६ रोजी यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. पुढे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या यशानंतर १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना आणि धोरणे राबवली. सहकार चळवळीला चालना देणे, कृषी आणि औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी भक्कम धोरणे आखणे या क्षेत्रांत त्यांनी मोठे योगदान दिले. महाराष्ट्राच्या प्रगतीचा पाया घालणारे नेतृत्व म्हणून त्यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा देशावर मोठे संकट आले होते. त्या काळात तत्कालीन पंतप्रधान गुरुहरीश्रश्र छशर्ही यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीला बोलावून देशाच्या संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी दिली. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात यशवंतराव चव्हाण यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. कार्यक्षम प्रशासक, दूरदर्शी राजकारणी, उत्कृष्ट संसदपटू आणि उदारमतवादी नेता म्हणून त्यांनी जनमानसात आपली वेगळी ओळख निर्माण केली. महाराष्ट्राच्या विकासाचा पाया घालणारा नेता म्हणून त्यांनी राज्याच्या इतिहासात मानाचा तुरा रोवला. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राला प्रगतीची नवी दिशा मिळाली.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंना स्मृतिदिनी अभिवादन

तळेगाव दिघे (युवावार्ता प्रतिनिधी)- तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यानिमित्ताने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव जोंधळे विद्यालयात पुण्यतिथी निमित्ताने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य एच. आर. दिघे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी उपमुख्याध्यापक संजय दिघे, पर्यवेक्षक बी. सी. दिघे, ज्येष्ठ शिक्षक सुनील घुले, एकनाथ जोंधळे, दिलीप ताजने, बाबा जगताप, प्रभाकर जोरी, बी. एस. फटांगरे, मच्छिंद्र कासार, संजय डोंगरे, सुनील दिघे, निलेश भिडे, योगेश गांगुर्डे, राम गायकवाड, रविकिरण जोंधळे, महेश उगार, राकेश झनान, विकास शिंदे, भूषण जाधव, संजय आर. दिघे, युवराज गायकवाड, गोरख दिघे, आशा पन्हाळकर, अश्विनी कुऱ्हाडे, तुकाराम सोळसे, मच्छिंद्र सोनवणे, शालन उगले, शोभा गुंजाळ, शितल कडलग, मच्छिंद्र सोळसे, अण्णासाहेब कोटकर, धनश्री दिघे, गणेश दिघे, अविनाश बिऱ्हाडे, संभाजी सुर्वे, भाऊसाहेब दिघे, ओंकार भागवत उपस्थित होते.

पुण्यतिथी निमित्ताने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. प्रास्ताविक शालन उगले यांनी केले. सूत्रसंचालन राम गायकवाड यांनी केले. विकास शिंदे यांनी आभार मानले.

इराण-इस्त्राईल...

पान नं. ०१ वरुन-

ग्राहक सिलेंडर घेऊन रांगेत उभे राहत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक एजन्सीसमोर शेडची व्यवस्था नसल्याने महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना उन्हात उभे राहावे लागत आहे. गॅस वाहतुकीसाठी दुचाकी वाहने रस्त्यावर उभी केल्याने वाहतूक कोंडीही निर्माण होत असून काही ठिकाणी गोंधळाचे वातावरण पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर पसरत असलेल्या वेगवेगळ्या संदेशांमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस पुरवठा विस्कळीत झाल्याने सामान्य नागरिक, व्यावसायिक आणि उद्योग क्षेत्र मोठ्या अडचणीत सापडले आहे. ग्रामीण भागात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिस्थिती लवकर सुरळीत झाली नाही तर महिलांना पुन्हा चुली पेटवण्याची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे

अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या. अहमदनगर

महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर.

कार्यालय फोन नंबर - २३२६१४ Email id : ahmednagarfedration@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/फेडरेशन ६०७१/२०२५ दिनांक : २१/०१/२०२६

स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस

नमुना 'झेड'

(नियम १०७ पोट- नियम(११ (ड-१)पहा.)

ज्याअर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी श्री. रोकडेश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. आंबी दुमाला, ता. संगमनेर, जि. अ.नगर द्वारा : अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासुन आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे. खाली सही करणाऱ्याने जप्तीची नोटीस दिली असुन, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम १०७(११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. २०/०१/२०२६ दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करु नये. आणि व्यवहार केल्यास :- श्री. रोकडेश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. आंबी दुमाला, ता. संगमनेर, जि. अ.नगर यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

अ. नं	थकबाकीदारांचे नाव	थकबाकी रक्कम	नोटिस दिनांक	गावाचे नाव	गट क्रमांक भुमापन क्र.	क्षेत्र हे आर चौ मी	पूर्व	पश्चिम	दक्षिण	उत्तर
१	कर्जदार- ठुबे सुनिल संभाजी यांची मिळकत	दावा रक्कम- रु. ५२२१९८/- दि. ०८/०२/२०१८ पासुन १५% व्याज + इतर खर्च	मागणी नो. दि. ०४/१२/२०२१ जप्ती नो. दि. ०२/०१/२०२३	बेलापुर ता. अकोले	४९०/१/१	०.५७	मुळ नकाशा प्रमाणे			
१	कर्जदार- शिंगोटे सोपान श्रीपती यांची मिळकत	दावा रक्कम- रु. १८१८७५/- दि. ०८/०२/२०१८ पासुन १५% व्याज + इतर खर्च	मागणी नो. दि. ०४/१२/२०२१ जप्ती नो. दि. ०२/०१/२०२३	बदगी ता. अकोले	११०	०.१४	मुळ नकाशा प्रमाणे			
१	कर्जदार- शिवाजी मारुती फापाळे यांची मिळकत	दावा रक्कम- रु. ६५८९४/- दि. २०/०२/२००५	मागणी नो. दि. २२/०२/२०१९ जप्ती नो. दि. ०२/०१/२०२३	बेलापुर ता. अकोले	१४३/१	१.७५	मुळ नकाशा प्रमाणे			

दिनांक - २१/०१/२०२६
स्थळ - अ.नगर

(सही)
जे.डी. काळे
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या, अ.नगर

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
ANIS MOHAMED HABIB SHAIKH
TO NEW NAME AS
ANIS MOHAMMAD HABIB SHAIKH
ADD - NAIKWADPURA, JORVE NAKA, A/P TAL- SANGAMNER, DIST -AHMEDNAGAR

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
ANISABANO SHAIKH NOOR MOHAMMED
TO NEW NAME AS
ANISABANO ABRAR SHAIKH
ADD - GHAR NO 1410/3, KAUTH GALLI, MOMIN PURA, SANGAMNER, TAL- SANGAMNER, DIST -AHMEDNAGAR

पाहिजेत
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

पाहिजेत
अकाउंटंट (महिला/ पुरुष)
अनुभवास प्राधान्य
पत्ता- अकोले बायपास रोड, संगमनेर
8308111211

पाहिजेत
ऑफिसबॉय (शिपाई) ०१ जागा (पुरुष)
शैक्षणिक पात्रता- १०/१२ वी पास
वयमर्यादा- २० ते ४० वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दि. १४/०३/२०२६ पर्यंत जमा करावे
संपर्क- महेश नागरी सहाकरी पतसंस्था मर्या. संगमनेर, अशोक चौक, संगमनेर फोन- ०२४२५-२२०७७७
email- mahesh.patsanstha@gmail.com

पाहिजेत
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

बौद्ध वधू पाहिजे
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

पाहिजेत
स्कुप अँड जॉय या नामांकित कुल्फी ब्रँडसाठी खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्सिक्युटिव्ह (४ जागा)
हिंगे मिल्क अँड मिल्क प्रोडक्ट्स प्रा. लि. संगमनेर
9112069393

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहमगदनगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५१६/२०२६ दिनांक - २५/०२/२०२६

जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती. चंदाबाई दिगंबर काळे, रा. शेंडेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २०/०१/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. शेंडेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे चंदाबाई दिगंबर काळे, यांचा जन्म मौजे शेंडेवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक १३/०२/१९७० रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी शेंडेवाडी, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी शेंडेवाडी, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर

अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
मालपाणी उद्योग समूह आयोजित
MALPANI

भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजिनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

त्वरीत पाहिजेत
सेल्सपर्सन ०६ जागा
(अनुभवी पुरुष / महिला) आकर्षक पगार व सवलती
संपर्क - 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर, ०२४२५, ७५८८२४९८४९

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ अनुभव असल्यास प्राधान्य
घरकाम करणारी महिला- १ सर्व घरकाम
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन - २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही २ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता- प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

त्वरित पाहिजेत
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर | स्टोअर मॅनेजर | फ्लोअर मॅनेजर | हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

पाहिजेत
हॉटेल दौलत स्फ्रिशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

ड्रायव्हर पाहिजे
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२
सेल्यमन - ०२
ड्रायव्हर - ०२
दुकान काम व शोरुमसाठी - ०२ जागा
महिला कामगार - ०२
9822097904

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

तिसऱ्यांदा खासदार झाल्याबद्दल ना. आठवलेंचा संगमनेर आरपीआय तर्फे सत्कार

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची राज्यसभेवर सलग तिसऱ्यांदा बिनविरोध निवडून होऊन त्यांनी 'हॅट्रिक' साधली आहे. या निवडीनंतर ना. आठवले हे ८ मार्च रोजी शिर्डी दौऱ्यावर आले असता संगमनेर तालुक्याच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत व सत्कार करण्यात आला.

ना. रामदास आठवले यांची संसदेतील कामगिरी आणि उपेक्षितांच्या प्रश्नांवर असणारी त्यांची पकड यामुळे त्यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. मंत्रीपदाच्या माध्यमातुन त्यांनी समाजातील अनेक घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महाराष्ट्रासह देशभरातील रिपब्लिकन कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण पसरले आहे.

डॉ. आठवले यांचे स्वागतप्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे संगमनेर तालुकाध्यक्ष आशिक शेळके, शहराध्यक्ष कैलास कासार, जनार्दन साळवे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजुर येथील शेतकऱ्यांच्या तक्रारींची गंभीर दखल घ्या - सुशांत आरोटे

राजुर
()-
राजुर ता. अकोले जिल्हा अहिल्यानगर येथील आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात भात शेतीचे उत्पादन होत असते.भाताचे आगार म्हणून राजुर आणि आदिवासी भागाची ओळख आहे., सध्या चालू हंगामात राजूर परिसरातील शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार सदोष भाताच्या बियाणांमुळे उत्पादनात मोठी घट आल्याचे शेतकरी सांगत आहेत., या घटनेमुळे भात पिकवणारा शेतकरी पुरता हवालदील झाला आहे.

दप्तरी १२५ भाताच्या वाणा संबंधी मोठी तक्रार शेतकरी करत असून कृषी विभाग अहिल्यानगर,आणि अकोले तालुका कृषी विभाग तसेच पंचायत समिती कृषी विभाग आणि बी बियाणे गुण नियंत्रक यांनी तातडीने शेतकऱ्यांच्या तक्रारींची गंभीर दखल घेऊन राजूर आणि परिसरातील शेतकरी तसेच तक्रारदार शेतकरी बांधवांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करून सदोष बियाणे विक्री करणाऱ्या संबंधित कंपनीवर तातडीने कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना नुकसान भरून मिळवून द्यावी.अशी आग्रही मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष सुशांत आरोटे व स्वाभिमानी शेतकरी संघटनेसह सर्व शेतकरी बांधवांनी केली आहे.

राजुर आणि परिसरात दप्तरी १२५ भाताचे वाण आणि इतर तक्रार असणाऱ्या भाताच्या वाणांचे कृषी विभागाने तातडीने ऑडिट करून संबंधित कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई करून द्यावी. संबंधित सदोष वाणांवर तालुक्यात तातडीने बंदी घालावी .,तसेच कृषी विभागाने कोणतीही कारणे न देता कंपनीकडून तातडीने नुकसान भरपाई मिळवून शेतकऱ्यांना देण्यात यावी.अशी आग्रही मागणी यावेळी शेतकरी आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे.

कृषी विभागांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून द्यावी.,अन्यथा संबंधित शेतकऱ्यांसह कृषी विभाग कार्यालय या ठिकाणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसह स्वाभिमानी शेतकरी संघटना कृषी कार्यालयात ठिय्या आंदोलन करील.,असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेसह शेतकऱ्यांनी दिला आहे तसेच राजूर या ठिकाणच्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मानसिक व आर्थिक त्रास झाला असून या त्रासाच्या पोटी शेतकऱ्यांना तातडीने संबंधित दप्तर १२५ वाण असलेल्या कंपनीकडून व इतर सदोष बियाणे आढळलेल्या कंपन्यांकडून तातडीने नुकसान भरपाई कृषी विभागांनी मिळून द्यावी.

अशी आग्रही मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष सुशांत आरोटे, उपाध्यक्ष सुनील पुंडे,कार्याध्यक्ष संतोष उगले, युवा अध्यक्ष शुभम आंब्रे,सोमनाथ आहेरज्ञानेश्वर आहेर , राजुर आणि राजुर परिसरातील शेतकरी यांनी केली आहे.

राजूर येथील बियाणेंबाबत शेतकऱ्यांच्या मोठ्या तक्रारी असून दप्तरी १२५ वाण आणि इतर सदोष भाताच्या वाणांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून कृषी विभागाने तातडीने संबंधित कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी. तसेच हा मुद्दा आमदार डॉ किरण लहामटे साहेबांनी अधिवेशनात उपस्थित करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा.

सुशांत आरोटे , तालुका अध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना अकोले

झरेकाठी येथे डाळिंबाच्या बागेत आढळला कोब्रा

झरेकाठी वार्ताहर, संगमनेर
तालुक्यातील झरेकाठी येथील डाळिंब उत्पादक शेतकरी, पद्मश्री कारखान्याचे माजी संचालक पोपटराव आनंदराव वाणी यांच्या डाळिंबाच्या बागेच्या बांधामध्ये बिग साइज कोब्रा आढळून आला. हा त्या ठिकाणी एका बिळामध्ये शांत अवस्थेत बसून होता.

या घटनेची माहिती झरेकाठी येथील जनसेवा युवा मंचचे सदस्य यांनी सर्पमित्र शिवप्रसाद पवार यांना संपर्क साधून दिली. त्यानंतर सर्पमित्र शिवप्रसाद पवार हे तातडीने त्या ठिकाणी आले व व्यवस्थित व सावधगिरीच्या पद्धतीने बिग साईज कोब्रा पकडून कैद केले.

त्यामुळे त्या परिसरामध्ये दुर्दैवी घटना घडली नाही. त्याबद्दल सर्पमित्र शिवप्रसाद पवार, आश्वी यांचे झरेकाठी पंचक्रोशीतून आभार व्यक्त करण्यात आले आहे.

डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगम सेवाभावी ट्रस्ट संचलित डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल, ज्युनिअर कॉलेज व गॅलेक्सी प्री स्कूल, संगमनेर येथे दि. ४ मार्च २०२६ रोजी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. शाळेचा माजी विद्यार्थी अनुज ओजस डेरे याने चार्टर्ड अकाउंटंट (सनदी लेखापाल) या प्रतिष्ठित परीक्षेत यश संपादन केले.

तसेच जेईई मेन्स परीक्षेत विद्यार्थिनी सायली अमोघ कुलकर्णी हिने ९९.९३ पर्सेंटाइल मिळवत उल्लेखनीय यश मिळविले. याच परीक्षेत स्वयम अशोक हांडे याने ९९.३४ पर्सेंटाइल, तर मोहित संजय सोलंके याने ९६.१३ पर्सेंटाइल मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुणवंत विद्यार्थ्यांना फेटे बांधून, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत यशाचा प्रवास व अनुभव उपस्थितांसमोर मांडले.

या प्रसंगी संगम सेवाभावी संस्थेच्या संचालिका अंकिता डेरे, शाळेचे मुख्याध्यापक सुनीलकुमार शुक्ला तसेच उपप्राचार्या स्मिता गुंजाळ उपस्थित होत्या. संचालिका अंकिता डेरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्या यशातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

गुदमरलेला रस्ता झाला मोकळा, आश्वी खुर्द ग्रामपंचायतीच्या प्रयत्नांना यश

आश्वी (युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर तालुक्यातील व शिर्डी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या आश्वी खुर्द - हनुमानवाडी - दाढ खुर्द या सुमारे ३ किलोमीटर रस्त्याचा गुदमरलेला श्वास अखेर मोकळा झाला आहे. आश्वी खुर्द ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी अथक प्रयत्न करून या रस्त्यावरील झाडांची छाटणी केली, खड्डे बुजवले आणि बंद पडलेल्या स्ट्रिट लाईट सुरू केल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन वर्षांपासून या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेल्या झाडांमुळे हा मार्ग धोकादायक बनला होता. झाडांच्या दाट फांद्यांमध्ये ग्रामपंचायतीच्या स्ट्रिट लाईट अडकून बंद पडल्या होत्या. त्यामुळे रात्रीच्या वेळी या मार्गावर अंधार पसरत होता. शिवाय झाडांच्या आक्राळ-विक्राळ वाढीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर ओलाव्याचा परिणाम होत होता. या परिसरात बिबट्यांचा वावर वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. परिणामी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि ग्रामस्थांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता.

या रस्त्याचा वापर वाल्हेकर, दातीर, भालेराव, भोसले, गायकवाड, मोरे, गुणे, सोनवणे, भवर, खर्डे, मांढरे, शिंदे, गव्हाणे आदी कुटुंबांसह गावातील मोठा भाग करत असल्याने या रस्त्यावरील वर्दळ मोठी आहे. स्थानिक ग्रामस्थांनी या समस्येबाबत ग्रामपंचायत सरपंच अलका गायकवाड, उपसरपंच बाबा भवर, तसेच सदस्य संजय भोसले, सोपान सोनवणे, सागर भडकवाड यांच्यासोबत बैठक घेतली. यावेळी ना. राधाकृष्ण विखे यांचे स्वीय सहाय्यक बापूसाहेब गायकवाड यांनाही या समस्येची माहिती देण्यात आली.

यानंतर ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी वनविभागाकडे लेखी निवेदन देऊन झाडांची छाटणी करण्याची परवानगी घेतली. परवानगी मिळताच झाडांच्या फांद्या कापण्यात आल्या व काही झाडे हटविण्यात आली. त्यानंतर तातडीने रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले आणि स्ट्रिट लाईट पुन्हा सुरू करण्यात आल्या.

काही दिवसांपूर्वी ना. राधाकृष्ण विखे यांनी या रस्त्यालगत असलेल्या निलेश भवर यांच्या वस्तीवर ग्रामस्थांची बैठक घेतली होती. त्या वेळी ग्रामस्थांनी रस्त्याची समस्या त्यांच्या समोर मांडली होती. यानंतर त्यांनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत लवकरच या रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे व रस्ता रुंदीकरण करण्याचे आश्वासन दिले. ग्रामपंचायतीच्या पुढाकारामुळे आता हा रस्ता स्वच्छ, प्रकाशमान आणि सुरक्षित झाला आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थीही आणि शेतकऱ्यांच्या अडचणीही मोठ्या प्रमाणात कमी झाल्या आहेत. या कामाबद्दल परिसरातील ग्रामस्थांनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

गेली दोन वर्षापासुन या रस्त्याचा वापर करणारे शालेय विद्यार्थी, पालक, शेतकरी, प्रवाशी जिव मुठीत धरुन प्रवास करत होते. मात्र अनेक वेळा प्रयन्त करूनही तांत्रिक अडचणी येत होत्या. अखेर ग्रामस्थ व ग्रा.प. पदाधिकारी यांच्या प्रयन्तातुन हा प्रश्न सुटला. तसेच ना. राधाकृष्ण विखे, व मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्या प्रयत्नातून सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत रस्ते विकासासाठी आश्वी खुर्द ते हनुमानवाडी दाढ खुर्द रस्त्यास रुपये ३ कोटी निधी मंजूर झाला आहे.

अलका गायकवाड, (सरपंच- आश्वी खुर्द)

डिजिटल युगातील स्त्री : संधी आणि सुरक्षितता

सर्वप्रथम सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या खूप खूप शुभेच्छा आणि तिच्या अस्तित्वाला मानाचा मुजरा. संघर्ष, सामर्थ्य आणि सन्मानाचा तिचा हा प्रवास खरोखर वाखाणण्यासारखा आहे. जुन्या चालीरीती, रुढी परंपरा, पुरुषप्रधान संस्कृती, शिक्षणाचा अभाव यासारख्या अनेक गोष्टींचा स्त्री जीवनावर झालेला परिणाम ते स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी दिलेला तिचा लढा प्रेरणा देणारा आहे. चार भिंतीतील आयुष्य ते एकविसाव्या शतकातील झालेला स्त्री जीवनातील क्रांतिकारी बदल आज आपण बघत आहोत. परंतु हे सर्व बदल होताना सहन करावा लागलेला अपमान, शारीरिक, मानसिक छळ, समाजाचा, घरच्यांचा विरोध या सर्वांवर मात करण्याची तिची प्रचंड इच्छाशक्ती, या सर्व परिस्थितीतून ताऊन-सुलाखून निघालेल्या स्त्री ने सर्वच क्षेत्रांमध्ये स्वतःचे अस्तित्व निर्माण केले आहे. हा प्रवास सोपा नव्हता, त्यासाठी केलेले प्रयत्न, दिलेला लढा याचा हा परिपाक आहे.

आजची स्त्री फक्त स्वतंत्र नसून स्वतःच्या पायावर ठामपणे उभी आहे. सर्वच क्षेत्रात तिने तिचे अस्तित्व सिद्ध केले आहे. आजच्या या डिजिटल युगात ती स्वतःच्या पायावर उभी आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात ती आज फक्त सहभागी नसून सक्षमपणे नेतृत्व करताना दिसत आहे. खरोखर ही एक अभिमानाची गोष्ट आहे. आज व्हॉट्सअँप,फेसबुक, इंस्टाग्राम, यू ट्यूब यासारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर सक्रिय असून, तिने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. काही महिलांनी नोकरीचा मार्ग स्वीकारला तर कोणी ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय सुरू केले आहेत. ज्यामध्ये स्वयंपाक, हस्तकला , मेहंदी , रांगोळी, फिटनेस, ब्लॉगिंग, यू ट्यूब चॅनेल, शिक्षण यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये स्वतःचा ऑनलाईन प्लॅटफॉर्म तयार केला आहे. त्याच्यामुळे जगाच्या

कानाकोपऱ्यात त्यांच्यातील कलेला वाव मिळत असून, ती स्वावलंबी झाली आहे. ऑनलाइन व्यवसाय हा आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग बनला आहे. डिजिटल युगाने महिलांसाठी घरबसल्या काम करण्याची संधी निर्माण केली आहे. फ्रीलान्सिंग मध्ये लेखन, डिझाईन, कोडिंग तसेच ऑनलाइन शिकवणी, ई-कॉमर्सद्वारे वस्तूंची विक्री, डिजिटल मार्केटिंग यामुळे महिला कुटुंब सांभाळत आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत.आपली स्वतःची ओळख निर्माण करत आहे. उदाहरणार्थ- ज्यांनी आयुष्यात कधीही ऑनलाइन अकाउंट उघडले नाही किंवा 'अपस्किल' म्हणजेच नवीन कौशल्य शिकण्याचा विचारही केला नाही अश्या ग्रामीण महाराष्ट्रातील ७० वर्षांच्या आजी आज यूट्यूब सेन्सेशन बनल्या आहे.अहमदनगरपासून सुमारे १५ किमी अंतरावर असलेल्या सरोळा कासार गावातील सुमन धामणे यांच्या पारंपरिक पाककृतींना प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. त्यांच्या 'आपली आजी' या यूट्यूब चॅनलला अवघ्या सहा महिन्यांत सहा लाखांहून अधिक सबस्क्राइबर्स मिळाले होते.आता आजी ऑनलाईन मसाले सुद्धा विकतात. आज संपूर्ण महाराष्ट्र आज्जींना ओळखतो .तसेच श्रीनगरच्या अरिफा जान यांनी नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या पारंपरिक काश्मिरी 'नम्दा' (छरावर) कलेला यूट्यूबसोशल मीडिया आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून पुनरुज्जीवन दिले आहे. त्यांनी नम्दा कलाकारांना विशेषतः महिलांना एकत्र आणून आणि नवीन डिझाईन्सद्वारे जागतिक स्तरावर या हस्तकलेची नवी ओळख निर्माण केली आहे . आपल्या सर्वांना परिचित असलेले चरवहींर'ी ठशलळशि मराठी रेसिपीजसाठी प्रसिद्ध आहे. मधुरा बाचल यांनी मराठीत सोप्या पद्धतीने स्वयंपाक शिकवून मोठी ओळख निर्माण केली आहे. .अश्या अनेक महिलांची यशोगाथा आपल्याला ज्ञात आहे.

परंतु या सर्वांमध्ये सायबर सुरक्षा ही काळाची गरज आहे. या डिजिटल जगात धोकेही तितकेच गंभीर आहेत. सायबर फसवणूक, जढझ स्कॅम, बनावट प्रोफाइल, ऑनलाइन छळ, फोटो/डेटाचा गैरवापर हे प्रकार वाढत असून, महिलांनी आवश्यक काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी मजबूत पासवर्ड आणि ढ्ठ-ऋ्रर्ली - ींहशपींळलरींळेप वापरणे तसेच अनोळखी लिंक किंवा कॉलवर विश्वास न ठेवणे,वैयक्तिक माहिती सार्वजनिक न ठेवणे, इ. गरजेचे आहे. तरीही सायबर गुन्हा झाल्यास त्याविरुद्ध तक्रार नोंदवू शकता. भारत सरकारने सायबर फसवणुकीची तक्रार करण्यासाठी राष्ट्रीय हेल्पलाइन क्रमांक १९३० केला आहे.

भारतात महिलांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी अनेक उपक्रम सुरू आहेत : त्यामध्ये जून २०१८ पासून डिजिटल शक्ती (ऊळसळींरश्र डहरज्ञींळ) अभियानहे राष्ट्रीय महिला आयोगद्वारे चालवले जाणारे एक महत्त्वाचे उपक्रम आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे देशभरातील महिलांना सायबर सुरक्षा, डेटा गोपनीयता आणि डिजिटल साक्षरतेबद्दल जागरूक करणे. त्यांना ऑनलाईन गुन्ह्यांपासून (ऊलशी ऊीळाशी) वाचवण्यासाठी सक्षम बनवणे तसेच सुरक्षा आणि डिजिटल कौशल्यांचे प्रशिक्षण देणे हा होय.

यशोदा -ख, ज्याला तुमची-ख सखीदेखील म्हणतात. हा देखील राष्ट्रीय महिला आयोगद्वारे सुरू केलेला-खसाक्षरता कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम ग्रामीण आणि निमशहरी भारतातील महिलांच्या डिजिटल सक्षमीकरणावर केंद्रित आहे.यशोदा -खहा सर्वसमावेशक डिजिटल विकासासाठी भारताच्या विकसित भारत २०४७ व्हिजनचा एक भाग आहे. टाटा ट्रस्ट आणि गुगल यांचा 'इंटरनेट साथी' हा कार्यक्रम ग्रामीण महिलांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी आणि भारतातील ऑनलाइन लिंगभेद दूर करण्यासाठी सुरू करण्यात आलेला आहे. हा उपक्रम ग्रामीण भागातील महिलांना इंटरनेट वापरण्याचे प्रशिक्षण देतो, ज्यामुळे त्यांच्या उत्पन्नात आणि जीवनमानात सुधारणा होऊन त्यांना डिजिटल सक्षम बनवण्यास मदत होते. हा उपक्रम ग्रामीण महिलांना इंटरनेट आणि स्मार्टफोन वापरण्याचे प्रशिक्षण देऊन डिजिटल साक्षर बनवणे हा यामागचा हेतू आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मवर आपली कोणी फसवणून करू नये म्हणून आत्मविश्वास आणि जागरूकता हीच खरी ताकद आहे. डिजिटल साक्षरता ही आधुनिक स्त्रीची खरी शक्ती आहे. मुलींना लहानपणापासून तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे, ऑनलाइन सुरक्षिततेबद्दल जागरूक करणे आणि चुकीच्या गोष्टींना कायदेशीर मार्गाने सामोरे जाण्याची हिंमत देणे आवश्यक आहे.

स्त्रीने तंत्रज्ञानाचा वापर केवळ मनोरंजनासाठी नव्हे तर शिक्षण, करिअर आणि समाज परिवर्तनासाठी केला तर डिजिटल युग तिच्यासाठी सुवर्णसंधी ठरेल.डिजिटल युग स्त्रीसाठी संधींचे नवे आकाश घेऊन आले आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन व्यवसाय आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ती स्वतःची ओळख निर्माण करत आहे. मात्र या संधींचा लाभ घेताना सुरक्षिततेची जाणीव आणि सजगता राखणे अत्यावश्यक आहे. आता सुरक्षित, सक्षम आणि आत्मविश्वासाने उभे राहण्यासाठी समाजाने तिला साथ देणे ही काळाची गरज आहे. डिजिटल साक्षरता हीच आधुनिक स्त्रीच्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे. चला तर या डिजिटल युगात सुरक्षिततेचे आणि आत्मविश्वासाचे एक नवे पाऊल टाकूया.

प्रा. सुरेखा संतोष रहाणे,
संगमनेर महाविद्यालय, संगमनेर
संपर्क - 9096466773

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
P3M Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे

नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन 05
सेल्सगर्ल..... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर..... 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

आधार फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांना कार्तिक तांगडकर यांची आर्थिक मदत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कुणाला आई नाही तर कुणाला वडील... कुणी तर आई-वडिलांना पोरकी झालेली.. आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या अशा निराधार मुलांच्या शिक्षणासाठी संगमनेर येथील आधार फाउंडेशन १८ वर्षापासून कार्यरत आहे. पहिलीपासून तर आयटीआय, इंजिनिअर, डॉक्टर सारख्या पदवीपर्यंत अशा गरजू मुलांना प्रेरणा देत, पाठीवर शाबासकीची थाप टाकत आधार फाउंडेशनने अनेकांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे.

आधार फाउंडेशनचे काम समजून घेतलेले सामाजिक भान असलेले सिद्धार्थ एंटरप्रायजेस या कंपनीचे उद्योजक कार्तिक तांगडकर गेल्या पाच वर्षापासून आधार फाउंडेशनच्या आधार शैक्षणिक दत्तक पालक योजनेच्या अंतर्गत मुलांना आर्थिक मदत करत असतात.

पठार भागातील तांगडी या अतिदुर्गम गावात जन्मलेले व उच्च शिक्षणामुळे एअरफोर्स मध्ये कर्तव्य बजावणारे तांगडकर साहेब यांनी स्वतःचा वाढदिवस आधार फाउंडेशन मधील ११ गरजू मुलांच्या शिक्षणासाठी ५९ हजाराचा धनादेश देत समाजाला वेगळा संदेश दिला आहे. आधारकडे यावर्षी १८५ पेक्षा जास्त मुलं शैक्षणिक दत्तक पालक योजनेचे लाभार्थी आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यासह पुणे नाशिक मुंबई आदी जिल्ह्यातीलही अत्यंत गरजू मुलं फाउंडेशनच्या मदतीमुळे स्वतःच्या पायावर उभी राहत पुन्हा आधारला मदत करत आहेत. अशी माहिती प्रकल्प प्रमुख सुखदेव इल्हे यांनी दिली.

आधार फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेचे काम पारदर्शी असून विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक प्रशिक्षणासाठी लावलेल्या हातभारामुळे अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहिल्याचे पाहून समाधान वाटते.

कार्तिक तांगडकर, उद्योजक संगमनेर

आधार फाउंडेशनचे समन्वयक डॉ. महादेव अरगडे, विठ्ठल कडुसकर, पी डी सोनवणे, सोमनाथ मदने, बाळासाहेब पिंगळे, अनिल कडलग, तानाजी आंधळे, लक्ष्मण कोते, विनोद राऊत यांसह आधारचे सर्व शिलेदार यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत. दरम्यान, आधार फाउंडेशनच्या या उपक्रमामुळे अनेक निराधार विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी दिशा मिळत आहे. समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे या मुलांच्या आयुष्याला नवी उमेद आणि आधार मिळत आहे.

आनंदी जीवनाचा मंत्र देत ७२ वर्षांच्या आजीची क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आनंदी जीवन जगण्यासाठी वयाचे बंधन नसते. आनंद आणि उत्साह हा सर्व आजारांवर मोठे औषध आहे. डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या एकविरा क्रीडा महोत्सवात राजापूर येथील ७२ वर्षीय आजीने क्रिकेटच्या मैदानात उतरत फलंदाजी आणि गोलंदाजी करून महिला व युवतींना तणावमुक्त जीवन व चांगल्या आरोग्याचा मंत्र दिला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे एकविरा फाउंडेशनच्यावतीने आयोजित क्रीडा महोत्सवात चौथ्या दिवशी सहेली ग्रुप राजापूर संघाचे ७२ वर्षीय अंजनाबाई बाबुराव शिंदे या आजीने नेतृत्व केले. आजीला पाहताच सर्व तरुणी व महिलांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला. एकविरा फाउंडेशनची कॅप डोक्यावर घालत आजी टॉस

उडवण्यासाठी मैदानात आल्या. याचबरोबर सर्व महिलांना प्रोत्साहित केले. यावेळी कॅन्सर तज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात उपस्थित होत्या.

आनंदी जीवन जगण्यासाठी वयाचे बंधन नसते. चांगला आहार व्यायाम आणि शांत झोप महत्त्वाचे असून महिलांनी सातत्याने उपक्रमशील राहिले पाहिजे. आजार आपोआप दूर पळून जाईल असा सल्ला त्यांनी दिला. याचबरोबर प्रथम फलंदाजीसाठी उतरताना आजीने दोन चौकारांसह १२ धावा केल्या. पूर्णवेळ क्षेत्ररक्षण केले. आजीचा सहभाग आणि उत्साह यामुळे सहेली राजापूर ग्रुपने सलग दोन मॅचेस जिंकल्या. फलंदाजी बरोबरच गोलंदाजी मध्ये ही आजीने कमाल केली. दोन बळी सुद्धा घेतले.

याप्रसंगी बोलताना ७२ वर्षी आजी अंजनाबाई शिंदे म्हणाल्या की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुका सुजलाम सुफलाम बनवला आहे. या तालुक्यात कोणतीही कमी नाही. आपला माणूस राज्य पातळीवर काम करतो हा सगळ्या महिला भगिनींना अभिमान आहे. त्यांनी सर्व सुख सुविधा निर्माण करून दिल्या. मुली शिक्षणातून पुढे जात आहे. डॉ.जयश्रीताई थोरात यांनी महिलांच्या आरोग्यासाठी काम केले.

तर डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एकविरा फाउंडेशनच्या वतीने चौथ्या वर्षीच्या या मॅचेस सुरू आहे.

१३ वर्षे कोमात असलेल्या तरुणाला सर्वोच्च न्यायालयाची इच्छामृत्यूची परवानगी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी ३१ वर्षीय व्यक्तीला इच्छामृत्यूची परवानगी दिली आहे. गाझियाबादचे रहिवासी हरीश राणा १३ वर्षांपासून कोमात आहेत. हरीश लाइफ सपोर्ट सिस्टमवर आहेत. देशातील अशा प्रकारची ही पहिलीच घटना आहे. न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने एम्सला हरीश राणा यांना उपशामक काळजीमध्ये (पेलिएटिव्ह केअर) दाखल करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून जीवनरक्षक उपचार टप्प्याटप्प्याने काढता येतील.

न्यायालयाने म्हटले की, ही प्रक्रिया अशा प्रकारे केली पाहिजे की रुग्णाची प्रतिष्ठा कायम राहील.दिल्लीत जन्मलेले हरीश राणा चंदीगडच्या पंजाब विद्यापीठातून बीटेकचे शिक्षण घेत होते. २०१३ मध्ये ते वसतिगृहाच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडले. यामुळे त्यांच्या संपूर्ण शरीराला लकवा मारला आणि ते कोमात गेले. ते काही बोलू शकत नाहीत किंवा काहीही अनुभवू शकत नाहीत.

डॉक्टरांनी सांगितले आहे की मुलाच्या मेंदूच्या नसा पूर्णपणे सुकल्या आहेत. त्याच्या उपचारासाठी त्यांना दिल्लीतील द्वारका येथील आपले घर विकावे लागले. आता ते गाझियाबादमधील दोन खोल्यांच्या एका फ्लॅटमध्ये राहतात. अशोक राणा ताज केटरिंगमध्ये नोकरी करत होते. तेथून निवृत्त झाल्यानंतर आता त्यांना दरमहा ३६०० रुपये पेन्शन मिळते. शनिवार आणि रविवारी ते गाझियाबादमधील एका क्रिकेट मैदानावर सँडविच आणि बर्गर विकतात, जेणेकरून कोणत्याही प्रकारे घराचा खर्च आणि मुलाचा उपचार होऊ शकेल. ते म्हणतात की आता त्यांच्याकडे मुलाच्या उपचारासाठी पैसे नाहीत, त्यामुळे ते कोर्टाकडून इच्छामृत्यूची मागणी करत आहेत. हरीशची आई निर्मला राणा यांचेही हेच म्हणणे आहे की, त्यांनी त्याच्या बरे होण्याची आशा गमावली आहे. त्यांच्यानंतर मुलाला पाहणारे कोणी नाही.

INVOFIX
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
- 24x7 Technician
- One Time Blood Tubing Use
- Modern Dialysis Centre
- Nephrologist, AVF Surgery
- Renal Dialysis
- Dialysis Catheter Insertion
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दुर्शन
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी लेडीज वेअर
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग - अतिदक्षता विभाग - अपघात विभाग - डायलिसीस विभाग - सुपर स्पेशालिटी विभाग - न्यूरोविभाग - हृदयरोग विभाग - मेडिसीन विभाग - अद्ययावत कॅथलॅब - जॉईंट रिप्लेसमेंट - स्पाईन सर्जरी - मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25